जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2026

सकाळ



कोल्हापूर : विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाच्या परिसरात कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी वृक्षारोपण केले. यावेळी डॉ. प्रकाश बच्छाव व मान्यवर उपस्थित होते.

# 'उच्चशिक्षण कार्यालया'चा परिसर बहरणार हिरवाईने

## विविध ६७ प्रजातींच्या २५१ वृक्षांचे केले रोपण

कोल्हापूर, ता. १० : येथील कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाचा परिसर हिरवाईने बहरणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते विविध ६७ प्रजातींच्या २५१ वृक्षांचे रोपण करण्यात आले.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सहसंचालक कार्यालयातर्फे वृक्षारोपणाचा उपक्रम राबविला. मंत्री पाटील आणि कुलगुरू डॉ. कामत यांच्या नावाने वृक्ष लावले. मंत्री पाटील यांनी उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्राला नवी दिशा दिल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले. मुलींना मोफत शिक्षणाचा निर्णय, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी आदी कार्याची माहिती दिली. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी ही वृक्षलागवड केवळ एक दिवसाची औपचारिकता नसून भावी पिढ्यांसाठीचा मौल्यवान हरित वारसा असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी विलास कदम, नंदकिशोर लाघवे, डॉ. व्ही. एम. पाटील, प्रवीण कोडोलीकर, सचिन टिकेकर, शकील शेख, मकरंद ऐतवडे आदी उपस्थित होते. मनीषा नायकवडी यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आंधळे यांनी आभार मानले. या उपक्रमात विविध महाविद्यालयांच्या एनएसएस, एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी श्रमदान केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2026

तरुण भारत

# सहसंचालक कार्यालय परिसरात वृक्षलागवड

**कोल्हापूर :** 'एनएसएस' आणि 'एनसीसी' विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या परिसरात २५१ वृक्षांची लागवड करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते विविध ६७ प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. या वृक्षारोपण सोहळ्याचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते संपन्न झाले. विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी प्रास्ताविक केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. धनंजयराव गाडगीळ यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2026
सकाळ


# ज्येष्ठ कलाकारांच्या प्रदर्शनाचा उपक्रम स्तुत्य

## डॉ. कामत : ओल्ड इज गोल्ड प्रदर्शनाला प्रारंभ

कोल्हापूर, ता. १० : 'येथील ज्येष्ठ कलाकारांच्या कला मेळाव्याचा उपक्रम नक्कीच कौतुकास्पद आहे. चित्रकलेच्या विविध अंगांचा अभ्यास आणि नारळाच्या करवंटीपासूनच्या कलाकृती यांचा अनोखा संगम 'ओल्ड इज गोल्ड' संस्थेच्या प्रदर्शनातून अनुभवायला मिळतो,' असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी काढले.

जे. जे. स्कूल ऑफ आर्टप्रमाणे शिवाजी विद्यापीठातर्फे विविध ऋतुंच्या आगमनावेळी कलाकारांचा मेळावा घेण्यासाठी नक्कीच प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. अध्यक्षस्थानी रवींद्र उबेरॉय होते.

येथील शाहू स्मारक भवनमध्ये प्रदर्शन भरले असून, चित्रकार शिवाजी म्हस्के, वारली चित्र कलाकार एल. एम. गडगे आणि वृत्तपत्र छायाचित्रकार मोहन मेस्त्री यांच्या नारळाच्या करवंटीपासून केलेल्या कलाकृतींचा प्रदर्शनात समावेश आहे. रविवार (ता. १४) पर्यंत प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे. वयाच्या साठीत पीएलसी डिप्लोमा केल्याबद्दल सुभाष वाणी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर : कलाकृती प्रदर्शनाचे उद्‌घाटन जयेश ओसवाल यांच्या हस्ते झाले. यावेळी रवींद्र उबेरॉय, मोहन मेस्त्री, शिवाजी म्हस्के आदी.

दरम्यान, उद्योजक जयेश ओसवाल, पद्माकर कापसे, प्रा. संजय गायकवाड, सागर बगाडे, सुभाष वाणी, जगन्नाथ भोसले आदी यावेळी उपस्थित होते. शिवाजी मस्के यांनी प्रास्ताविक केले. प्रकाश अथणे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अप्पासाहेब पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2026
सकाळ

# चीनमधील स्पर्धेसाठी निवड; वैष्णवीचा विद्यापीठात सन्मान

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाची धावपटू वैष्णवी रावळ हिची चीनमध्ये ९ ते १२ जुलै दरम्यान होणाऱ्या २३ वर्षांखालील आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली. यानिमित्त कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते तिचा विद्यापीठात सत्कार झाला.

वैष्णवीने विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर सराव केला असून, गतवर्षी तिने विद्यापीठाचे यशस्वी प्रतिनिधित्व केले आहे. तिच्या कामगिरीची दखल घेत विद्यापीठाने तिला क्रीडा शिष्यवृत्ती दिली आहे. ती गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. यावेळी प्र कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. अनिल कुराडे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर** : आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल वैष्णवी रावळ हिचा कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित प्र. कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. अनिल कुराडे, डॉ. एस. एम. कदम, डॉ. राहुल मगदूम.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2025
पुढारी

# 'रवळनाथ सोसायटी'च्या कोल्हापूर शाखेमध्ये आनंद सोहळा उत्साहात

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**



**कोल्हापूर : श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीमध्ये दीप प्रज्वलनप्रसंगी डॉ. आर. के. कामत, अविनाश जोशी, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, एम. एल. चौगुले व मान्यवर.**

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी (मल्टिस्टेट) प्रधान कार्यालय गडहिंग्लजच्या कोल्हापूर शाखेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच १०० कोटी ठेव संकल्पपूर्तीनिमित्त आनंद सोहळा उत्साहात झाला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे निवृत्त सहायक महाव्यवस्थापक अविनाश जोशी, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थाध्यक्ष व संचालक एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. शाखाधिकारी सचिन चौगुले यांनी स्वागत केले. विजय हरगुडे यांनी अतिथींचा परिचय करून दिला. संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात एम. एल. चौगुले यांनी कोल्हापूर शाखेच्या यशस्वी प्रवासाचा उल्लेख करताना, शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या हस्ते शाखेचा शुभारंभ झाल्याची आठवण करून दिली. याप्रसंगी कोल्हापूर शाखेच्या गौरवशाली वाटचालीत मोलाचे योगदान दिलेल्या मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. किरण पोतदार, डॉ. दत्तात्रय पाटील, डॉ. मनोहर पुजारी, महेश मजती, राजश्री कोले, शाखा सल्लागार राजन जोशी यांच्यासह सभासद, ठेवीदार, हितचिंतक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शाखा सल्लागार डॉ. रवींद्र पोर्लेकर, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. चंद्रकांत पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव यांनी आभार मानले.

11 JUN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ई वेस्ट ठरणार बेस्ट : सोन्याचीही होणार उपलब्धी!

## शिवाजी विद्यापीठातील ई कचरा संशोधन केंद्रात महत्त्वपूर्ण संशोधन सुरु : येत्या सहा महिन्यात फलनिष्पत्ती

**जनप्रवास : महेश गावडे**

शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स आणि ईव्हीस सेंटर अर्थात, ई कचरा संशोधन केंद्रामध्ये ई वेस्टमधून वेगवेगळे धातू काढण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, अशा ई कचऱ्यामधून वेगवेगळ्या बहुपयोगी धातूंबरोबरच सोन्याच्या पार्टचे आधी यशस्वीरित्या विलगीकरण करण्यात येऊन सोन्याचे शुध्दीकरण करण्याचे संशोधन युध्दपातळीवर सुरु आहे. या महत्त्वपूर्ण संशोधनाचे निष्कर्ष आता अंतिम टप्प्यापर्यंत आले आहेत. सैध्दांतिक अनुमान आणि झालेल्या सर्व्हेनुसार एक किलो गोल्ड प्लेटेट ई वेस्टमधून ३ ग्रॅम सोने प्राप्त होते. त्यादृष्टीने या संशोधनाला वेगळे



- एक किलो गोल्ड प्लेटेड ई वेस्टमधून ३ ग्रॅम सोने प्राप्त करणे शक्य
- येत्या शैक्षणिक वर्षापासून ई वेस्ट मॅनेजमेंट बंधनकारक करण्याचा प्रयत्न

महत्व प्राप्त झाले आहे. येत्या पाच ते सहा महिन्यात या संशोधनातून फलनिष्पत्ती हाती लागणार आहे, अशी माहिती ई-कचरा व्यवस्थापन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी जनप्रवासशी बोलताना दिली.

पर्यावरणात जैव कचऱ्याबरोबरच ई कचऱ्याचे प्रमाणही वाढत असल्याचे दिसून येत आहे. हवा, पाणी आणि अन्नपदार्थांतून तो मिसळला गेल्याने हा कचरा आरोग्याला घातक ठरु शकतो. ही बाब ओळखूनच आता शिवाजी विद्यापीठाने ई वेस्टचा सदुपयोग करण्याचे ठरवले आहे.

▶ पान ४ वर

ई वेस्टमध्ये लॅपटॉप, मॉनिटर, मोबाईल, हार्ड डिस्क, मदर बोर्ड आदींचा समावेश होतो. ई कचरा ही एक गंभीर समस्या म्हणून जगासमोर आलीय. ई कचऱ्याचे योग्य ते व्यवस्थापन करणे क्रमप्राप्त आहे. दुदैवाने तसे न झाल्यास भविष्यात नागरिकांना अनेक आजारांना तोंड द्यावे लागू शकते. यामुळे दुर्मिळ मूलद्रव्यांचे जतन करणे काळाजी गरज बनलीय. ई कचऱ्यात जवळपास १७ ते १८ मुलद्रव्ये आढळून येतात. ई कचरा व्यवस्थापना विद्यापीठामार्फत जुलै महिन्यापासून व्यापक मोहीम हाती घेणार आहोत, यासाठी ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, शिक्षक यांनी जनजागृतीसाठी पुढाकार घ्यावा.

**– प्रा. डॉ. मुरलीधर भानारकर,** समन्वयक : ई- कचरा व्यवस्थापन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 JUN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ई वेस्ट ठरणार बेस्ट : सोन्याचीही होणार उपलब्धी!

▶ पान १ वरून : विद्यापीठात २०२२ - २३ साली डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स या विभागात ई कचरा संकलन केंद्राची स्थापना झाली. या केंद्राने नुकताच पर्यावरण दिन साजरा केला. यावेळी विद्यापीठ कॅम्पसमधील ई वेस्ट जमा करण्याचे आवाहन करत डस्टबीनही ठेवले होते. त्याला प्रतिसाद देत सुमारे ४० किलोचा ई वेस्ट जमा करण्यात आला. या ई वेस्टमध्ये ॲल्युमिनियम, सिल्व्हर, लिथियम, कॅडमियम असे धातू आढळतात. साधारणपणे १ किलो गोल्ड प्लेटेड ई वेस्टमधून ३ ग्रॅम सोने मिळत असल्याचा सैध्दांतिक सर्व्हे सांगतो. याच दिशेने ई कचरा संकलन केंद्रात संशोधन सुरु असून ते अंतिम टप्प्यात आले आहे. या संशोधनासाठी कुलगुरु डॉ. कामत यांचे मार्गदर्शन लाभत आहे, अशी माहिती डॉ. बानारकर यांनी दिली. दरम्यान, या विषयावर एमएस्सी इलेक्ट्रॉनिक्सचे सुमारे ३० विद्यार्थी देखील या संशोधनात सहभागी झाले असून सोन्याच्या शुध्दीकरणाच्या प्रक्रियेचा निष्कर्ष येत्या ६ महिन्यात हाती लागणार असल्याचे प्रा. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी सांगितले. विद्यापीठातील सामाजिक समावेशन केंद्रामध्ये आता ई वेस्टबाबत दर महिन्याला शहरातील ठिकठिकाणी मुख्य चौकात एनएसएस विद्यार्थ्यांमार्फत प्रबोधनाची मोहीम हाती घेण्यात येणार असून या विषयावर जनजागृती रॅलीही काढण्यात येणार आहे. येत्या जुलैपासून ही मोहीम सुरु होईल. या शिवाय येत्या शैक्षणिक वर्षांपासून महाविद्यालयीन स्तरावरील पदव्युत्तर आणि पदवी अभ्यासक्रमात सर्व विद्या शाखांना ई वेस्ट मॅनेजमेंट हा विषय कायमस्वरुपी करण्यात येणार आहे. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव याबाबत अभ्यास मंडळांशी चर्चा करून २ क्रेडिटचा अभ्यासक्रम बंधनकारक करण्यासाठी प्रयत्न करतील, असे सूत्रांनी सांगितले.

**...तर प्रकल्प कोट्यवधीच्या घरात जाऊ शकतो**

भविष्यात ई वेस्ट मॅनेजमेंटची व्याप्ती वाढवण्याचा विचार आहे. यासाठी विद्यापीठ आणि शासनाचा पाठिंबा आणि प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. कोल्हापुरातून दर महिन्याला ई वेस्ट कचरा संकलन करुन तो दिल्लीतील नोएडा येथे पाठविला जातो. यासाठी कोल्हापुरात दिल्लीतील बरेचजण केवळ या धंद्यासाठी स्थायिक झाले आहेत. भविष्यात हा कचरा जर ते विद्यापीठातील ई कचरा संशोधन केंद्राला देणार असतील तर हा प्रकल्प कोट्यवधीच्या घरात जाऊ शकतो, यासाठी आगामी काळात विद्यापीठ योग्य तो निर्णय घेऊ शकते.

**१०० किलो गोल्ड प्लेटेट ई वेस्टमधून २०० ते ३०० ग्रॅम सोने**

जर अशाप्रकारचा सुमारे २०० ते ३०० किलो ई वेस्ट संकलित झाल्यास आणि त्यातून वेगवेगळ्या धातूंचे विलगीकरण आणि शुध्दीकरणाचा प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाल्यास त्यातून जवळपास १०० किलो गोल्ड प्लेटेट ई वेस्टमधून साधारणतः २०० ते ३०० ग्रॅम सोने प्राप्त होऊ शकते, ही थिअरी प्रत्यक्षात साकार झाली तर या संशोधनामुळे राष्ट्राच्या संपत्तीत मोठी भर पडणार आहे, हे निश्चित.